# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 16/12/2021 (गुरूवार)

---

### घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील पांडे ले आउट खापरखेडा श्री नथ्थु लक्ष्मण कळमकर यांचे घर रा दहेगाव त.सावनेर येथे दिनांक 14/12/2021 चे 21/15 वा ते 22.05 वा दरम्यान फिर्यादी नामे– नथ्थु लक्ष्मण कळमकर वय 58 वर्ष, रा. वार्ड क्र. 5 पांडे ले–आऊट, दहेगाव रंगारी यांचे मुलाचे रिसेप्शनचा कार्यक्रम असल्याने परिवारासह श्रीकृष्ण लॉन, दहेगाव येथे गेले. घराचा आंगणात मंडप टाकलेला मंडपात कॅंटर्सचा बाया काम करण्यासाठी घरीच असता फिर्यादीचे जावयाची आईचे औषध घेण्याकरीता फिर्यादीचे जावई व त्यांचा लहान मुलगा हे लॉन मधुन घरी आले व घराचा मेन दाराचे कुलुप उघडत असता मेन दरवाजा आतुन बंद असल्याचे निर्दशनास आल्याने दरवाजा आतुन का बंद आहे म्हणुन मागील दाराकडे जावुन पाहीले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने घराचे मागील दाराचे लॉक उघडुन आत प्रवेश करून बेडरूम मधील आलमारीत ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 2,60,000/–रू. व नगदी कॅंश 2,50,000/–रू. असा एकुण 5,10,000/–रू चा कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नी सुर्यप्रकाश मिश्रा मो.नं 9511290849 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील मौजा धवलपेठ व दुधाशिवार येथे दिनांक 12/12/2021 चे 00.00 वा. ते दिनांक 13/12/2021 चे 01.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अशोक मुरलीधर कावळे, वय 54 वर्ष, रा. मनिषनगर नागपूर हे मौजा ठवलपेठ शिवार मधिल साईडचे विद्युतीकरनाचे काम चालु असुन त्या ठिकाणावरून लोखंडी पोल 506 किलो कि. 5,060/–रू., एल टि लाईनचे लोखंडि पोल एकुन 20 लोखंडी पोल एकुण कि. 23,400/–रू. तसेच दुधाशिवारातील 33 के व्ही चे 16 लोखंडी पोल कि. 71,040/–रू., एल टि लाईनचे 30 लोखंडी पोल 35,100/–रू. ट्रान्सफार्मर डिपिचे 14 लोखडी पोल 17,002/–रू. असा एकुण कि. 1,70,020/–रू. मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रशान्त मांढरे मो.क्र. 9420215828 हे करीत आहे.

## कोळसा चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत इंदर आबोडी बर्डन कन्हान येथे दिनांक 14/12/2021 चे 22.00 वा. ते 22.30 वा. दरम्यान एमपी–20209 क्रमांकाच्या ट्रप्परचा चालक आरोपी 1) ट्रक क्र. एम.पी : 20209 चा चालक रा.कन्हान व 2) भुजंग महल्ले रा. टेकाडी यांनी संगनमत करून इंदर ओबीडी बर्डन कन्हान मधुन निवडलेला 8 टन कोळसा किंमती 32,000/–रू. चा मुद्देमाल ट्रक मध्ये भरून घेवुन पडाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संतोश ईदसीन यादव रा. कामठी क्वार्टर नं 527 कन्हान यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जैलाल सहारे मो. नं. 9309966392 हे करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 16 कि.मी. अंतरावरील हिंगणा टी पॉईंट पासुन 200 ते 250 मीटर हिंगणा कडे जाणाऱ्या डांबरी रोडवर दिनांक 03/10/2021 चे 17.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अरूंधती राजकुमार मोईत्रा वय 20 वर्ष, रा. प्लॉट नं. 145/146 प्लॉट क्र. ए/9 अंबाझरी हील टॉप नागपुर हिचा मित्र अतुल ढोक राहणार नागपुर, प्रकाश तागडे राहणार नागपुर यांचा ओळखीचा त्यांचा मित्र आरोपी नामे– सुमित प्रकाश तागडे वय 28 वर्ष, रा. अजनी पुलिया जवळ नागपुर याच्या सोबत फिर्यादी ची ओळख झाली आणि त्यांच्यात चांगली मैत्री झाली. दोघेही एकमेकांना पसंत करीत होते फिर्यादीला पुढील शिक्षणासाठी पुणे येथे जाणे असल्याने ही माहिती फिर्यादीने आरोपीला सांगीतले. आरोपीने फिर्यादीला जाण्यास मनाई केली व भेटण्यास सांगीतले असता फिर्यादी ही आरोपीला भेटली आरोपीने फिर्यादीला त्याच्या कारमध्ये बसवुन घटनास्थळी आणले आणि फिर्यादीला कारच्या बाहेर उतरवुन फिर्यादीला शिवीगाळ करून कारमधुन एक लोखंडी रॉड काढुन फिर्यादीच्या डाव्या पायावर मारून जखमी केले आणि आपली कार घेवुन तेथुन गेला. फिर्यादी तिच्या नातेवाईकाच्या मदतीने उपचार करून पुणे येथे शिक्षणाकरीता निघुन गेली भीतीमुळे फिर्यादी ने आरोपीविरूध्द तक्रार केली नव्हती नंतर दि. 10/12/2021 रोजी रात्री फिर्यादीचा मित्र अभिषेख यांच्या मोबाईल वरून आरोपी याने फिर्यादीच्या मोबाईल वर फोन करून तिला शिवीगाळ केली जिवाने मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपी याने फिर्यादीच्या डाव्या पायाला लोखंडी रॉडने मारल्याने पाय फॅक्चर झाला. सदरचा गुन्हा घटनास्थळ पो. स्टे. हिंगणा नागपुर शहर येथे असल्याने सदरचा गुन्हा नोंद करून त्या संबंधीत पोलिस स्टेशन ला माननीय वरीष्ठयांचे मार्गदर्शनात संबंधित पोलीस स्टेशनला पुढील तपासाच्या अनुषंगाने वर्ग करण्याची तजवीज ठेवण्यात येत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504, 506, 507 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सपाटे मो.नं. 9823998476 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कुही :– दिनांक 15/12/2021 चे 09.30 वा. दरम्यान वय 25 वर्ष फिर्यादी/पीडिता व हिचे घराच्या पाठीमागे अतीक्रमणच्या जागेत तिचे पतीने गाय बाधंली होती. फिर्यादी गाय पाहन्याकरीता गेली असता गाय कोणीतरी सोडली होती. तिने आजुबाजुला विचारले असता त्यांनी आरोपी नामे– विनोद धांडे, रा. कुही ता कुही जि. नागपुर याचे नाव सांगितले. त्यामुळे फिर्यादी हिने 'त्याला विचारले असता तो म्हणाला की, 'इथे गाय चारायची असेल तर मी तुला 500/–रू. देतो तु 1 दिवस माझ्या सोबत राह तेव्हा मी तुला गाय बांधु देईन' फिर्यादीला लज्जास्पद वाटल्याने फिर्यादीने आरोपी यास 1 झापड मारीन असे म्हटले याच्या अगोदर 08 दिवसा पुर्वी तो पानी पिण्याच्या बाहाण्याने आला व म्हणाला 2,000/–रू. देतो तिकडे चाल फिर्यादी त्याला शिवीगाळी केली व तो तेथुन निघुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 354 ए (2), 354 डी भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा शेन्डे हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत तिरूपती दालमिल कढोली येथे दिनांक 14/12/21 चे 18/30 वा दरम्यान 15/12/21 दरम्यान योगेंद्र सुनिल कुमार कबरेती (मृतक), वय 20 वर्ष रा. देलखिरी जि छिंदवाडा ह. मु. तिरूपती दालमिल कढोली याने अज्ञात कारणातुन तिरूपती दालमिल कढोली येथे आतुन दरवाजा बंद करून क्रिम रंगाच्या शॉलने स्लॅप वरील लोखंडी एंगलला बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– धारासिंग जनमनसा यहके, वय 22 वर्ष, रा. बुडडी ता परासिया जि छिंदवाडा ह.मु तिरूपती दालमिल कढोली यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक देवेन्द्र भुरे मो.क्र. 9588679714 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर